# मुंबईतील हरवलेल्या जंगलांचा शोध

## 'मिसिंग फॉरेस्ट ऑफ मुंबई'चे प्रकाशन

**म. टा. विशेष प्रतिनिधी**

- वनक्षेत्रात १२.३४ टक्के वाढ शक्य
- वणव्यांमधील वाढ चिंताजनक

**मुंबई :** मुंबईतील १ हजार ३५० हेक्टर क्षेत्र संरक्षित नसून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे हे उल्लंघन आहे. मुंबईतील या हरवलेल्या वनक्षेत्रासंदर्भात माहिती देणारे पुस्तक 'मिसिंग फॉरेस्ट ऑफ मुंबई' संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथे नुकतेच प्रकाशित करण्यात आले. मुंबईचे हे वनक्षेत्र संरक्षित झाले, तर मुंबईच्या वनक्षेत्रात १२.३४ टक्के वाढ होऊ शकते, असे या अहवालानुसार समोर आले आहे.




इंडिया स्टेट फॉरेस्ट रिपोर्ट २०१७ नुसार मुंबईमध्ये उपनगर जिल्ह्यामध्ये १४० चौरस किलोमीटर वनक्षेत्र आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान १०२ चौरस किलोमीटर क्षेत्रावर पसरलेले असून आरे वसाहत १२.४ चौरस किलोमीटर क्षेत्रावर वसलेली आहे. या दोन्हीचे मिळून वनक्षेत्र ११४.४ चौरस किलोमीटर होते. त्यामुळे अहवाल आणि प्रत्यक्ष आकडेवारी यात २५.६ चौरस किलोमीटर क्षेत्राची तफावत असल्याचे सांगत 'वनशक्ती' या संस्थेने मुंबईतील उर्वरित वनक्षेत्र नेमके कोणते आहे याचा शोध घेण्यास सुरुवात केली. यातून 'मिसिंग फॉरेस्ट ऑफ मुंबई' हे पुस्तक आणि अहवाल समोर आला.

मुंबईमध्ये लागणाऱ्या वणव्यांचे प्रमाण वाढत असून सन २०१४ मध्ये ही संख्या ७०२ होती. तर सन २०१७ मध्ये ही संख्या ३ हजार ४८७ वर पोहोचली. या पार्श्वभूमीवर जून २०२१ ते ऑक्टोबर २०२२ सर्वेक्षण करण्यात आले. यासाठी १ हेक्टरहून अधिक हरितक्षेत्र असलेल्या ठिकाणांचा विचार करण्यात आल्याची माहिती 'वनशक्ती'तर्फे देण्यात आली. या सर्वेक्षणानुसार मुंबईत गवत, झुडुपे, रोपटी, फळे-फुले देणारी झाडे अशा विविध प्रजाती आढळून आल्या. या १११ प्रजातींच्या वनस्पतींमध्ये फुले-फळे देणाऱ्या ८७ वनस्पती, ५ औषधी वनस्पतींचे प्रकार, १४ झुडुपे, तीन वेली, १ गवताचा प्रकार, १ नेचे यांचा समावेश आहे. या भागांना संरक्षण मिळणे गरजेचे आहे. हे संरक्षण मिळाले तर मुंबईच्या वनक्षेत्रामध्ये १२.३४ टक्के अशी वाढ होऊ शकते, असे यात म्हटले आहे.

देशाच्या सन १९८८ च्या वन धोरणानुसार देशाच्या एकूण भूभागापैकी ३३ टक्के भूभागावर जंगल असणे अपेक्षित आहे. सन २०२१ च्या वन सर्वेक्षण अहवालानुसार देशात ७ लाख १३ हजार ७८९ चौरस किलोमीटर क्षेत्र हे वनक्षेत्र असून हा देशाच्या एकूण क्षेत्रापैकी केवळ २१.७१ टक्के भूभाग आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये १ हजार ५४० चौरस किलोमीटर वनक्षेत्र वाढ अपेक्षित होती. पण, सन २०२१ मधील अहवालाबद्दल अनेक प्रश्न निर्माण झाले. या अहवालात वनक्षेत्र म्हणून गवत, शेती, लावलेली झाडे याचाही समावेश करण्यात आल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. महाराष्ट्रात वनक्षेत्राचा उपयोग वनक्षेत्राव्यतिरिक्त इतर कामांसाठी करण्यात आला आहे. त्यामुळे हे वनक्षेत्र जपले जाणे आवश्यक आहे.